Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary
Education S.R.No.832-A, Final Plot
No. 178,179, Near Balchitrawani,
Behind Agharkar Research
Institute, Bhamburda,
Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ, स.न.८३२ ए,
फा.प्लॉ.नं.१७८, १७९, बालचित्रवाणी
शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या
मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर,
पुणे-४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 | EPABX -25705000 |
Email : secretary.stateboard@gmail.com

क्र.रा.मं/परीक्षा-७/ ६४२
पुणे ४११००४
दिनांक १४/०२/२०२६

प्रति,
विभागीय सचिव,
सर्व विभागीय मंडळे.

विषय- शास्त्रीय कला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे वाढीव गुण देणाऱ्या संस्थांची निवड करणेबाबत

संदर्भ –
१) शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१६/प्र.क्र.२०२/एसडी-२, दि.२४ नोव्हेंबर २०१७
२) मा.संचालक महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांचे दिनांक ३१ डिसेंबर २०२५ चे पत्र
३) शासनाचे क्रमांक संकिर्ण ३८२६/प्र.क्र.०३/एसडी-२ दिनांक १४/०१/२०२६
४) या कार्यालयाचे क्र.रा.मं/परीक्षा-७/२९५ दि.२३/०१/२०२६
५) शासनाचे क्रमांक संकिर्ण ३८२६/प्र.क्र.०३/एसडी-२ दिनांक ०३/०२/२०२६
६) या कार्यालयाचे क्र.रा.मं/परीक्षा-७/४६९ दि.०३/०२/२०२६
७) मा.संचालक महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांचे दिनांक ०६ फेब्रुवारी २०२६ चे पत्र
८) शासनाचे क्रमांक संकिर्ण ३८२६/प्र.क्र.०३/एसडी-२ दिनांक १३/०२/२०२६

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय शासन निर्णय क्र.१ नुसार माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेसाठी प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांना शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याची कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे.

मा.संचालक महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांचे संदर्भ क्र.२ व ७ नुसार माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेमध्ये सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याच्या प्रयोजनार्थ पात्र अशा एकूण ७१ (५९ व १२) संस्थांची यादी शिफारस करून शासनास सादर केली आहे.

शासनाचे संदर्भिय पत्र क्र.३ नुसार ५९ पात्र संस्थांपैकी ४१ संस्थांना मान्यता दिली आहे व शासनाचे संदर्भिय पत्र क्र. ५ नुसार ४१ संस्थांच्या यादीमध्ये नव्याने ०४ संस्थांचा समावेश केला आहे. सदर बाब या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्र.४ व ६ नुसार आपणांस कळविली आहे.

**याबाबत शासनाने संदर्भ क्र.८ च्या पत्रानुसार (४१ व ०४) अशा एकूण ४५ संस्थांच्या यादीमध्ये नव्याने १३ संस्थांचा समावेश केला असून सदर १३ संस्थांची यादी यासोबत पुढील उचित कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे.**

तरी यासंदर्भात विभागीय मंडळ स्तरावर उचित कार्यवाही करावी व सदर बाब आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व माध्यमिक शाळा, मुख्याध्यापक, विद्यार्थी तसेच सर्व संबंधित घटकांना लिखित स्वरूपात अवगत करून देण्याबाबतची पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(मा.अध्यक्ष यांच्या मान्यतेने)

(डॉ.दिपक माळी)
सचिव
राज्यमंडळ, पुणे.

क्र.कोविमं/माध्य.परीक्षा/ ७१५
कोल्हापूर -४१६००४
दिनांक:- 16 FEB 2026

प्रत,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त शाळा,
सातारा, सांगली, कोल्हापूर

विषय:- शास्त्रीय कला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे वाढीव गुण देणाऱ्या संस्थांची निवड करणेबाबत.

उपरोक्त विषयास अनुसरुन वाढीव संस्थांच्या राज्य मंडळ, पुणे यांचे वरील प्रकटनाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

(सुभाष रा. चौगुले)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय (विस्तार), दालन क्र.४३६,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
ईमेल- sd२.sesd-mh@mah.gov.in

क्रमांक: संकीर्ण-३८२६/प्र.क्र.०३/एसडी-२ दिनांक :- १३ फेब्रुवारी,२०२६.

प्रति,

(१) संचालक,
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्राशिक्षण परिषद, पुणे.

(२) अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक, शिक्षण मंडळ,पुणे.

विषय :- शास्त्रिय कला क्षेत्रात प्राविण्य मिळविणा-या व लोककला प्रकारात सहभागी होणा-या विद्यार्थ्यांना सवलतीचे वाढीव गुण देणा-या संस्थांची निवड करणे बाबत.

संदर्भ :- १) शालेय शिक्षण विभागाचे दिनांक: २४ नोव्हेंबर २०१७ चे पत्र.
२) संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांचे दिनांक ३१ डिसेंबर २०२५, दि.१६ जानेवारी २०२६ व दि.०६ फेब्रुवारी २०२६ चे पत्र.
३) शालेय शिक्षण विभागाचे समक्रमांकाचे दिनांक: १४.०१.२०२६ व दि.०३.०२.२०२६ रोजीचे पत्र.

महोदय,

संदर्भ क्रमांक १ येथील शासन निर्णयान्वये माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेसाठी प्रवेशीत होणा-या विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्रासोबतच कला, चित्रकला, शास्त्रियनृत्य, लोककला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या कलेचा उपयोग त्यांच्या भविष्याच्या प्रगतीपटासाठी होण्यासाठी, तसेच लोककला हे समाज प्रबोधनाचे माध्यम असल्याने लोककलेची वाढ व संवर्धन करण्याचे काम अनेक शालेय विद्यार्थी करीत असतात अशा विद्यार्थ्यांना प्रोत्साहन म्हणून माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेमध्ये क्रीडा गुणांच्या धर्तीवर शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याची कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे.

२. संदर्भ क्रमांक २ मधील पत्रान्वये संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिपद, पुणे यांनी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेमध्ये सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याच्या प्रयोजनार्थ पात्र अशा एकूण ७१ संस्थांची यादी शिफारस करुन शासनास सादर करण्यात आली होती.

३. संदर्भ क्रमांक ३ च्या पत्रान्वये ४५ संस्थांना शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण मिळण्यासाठी आवश्यक प्रमाणपत्रें सादर

करण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे. तसेच उर्वरीत संस्थांना त्रुटीपुर्तता करण्यास कळविण्यात आहे होते. उर्वरित संस्थापैकी १३ संस्थानी त्रुटींची पुर्तता केली आहे (संस्थाची यादी सोबत जोडली आहे.) अशा मान्यता प्राप्त ४५ संस्थांच्या यादीमध्ये उपरोक्त १३ संस्थांचा समावेश करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. तरी अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी सदर निर्णयाच्या अनुषंगाने तात्काळ आपल्या स्तरावरुन आवश्यक त्या सूचना निर्गमित कराव्यात, जेणेकरुन संबंधित विद्यार्थ्यांना त्यांच्या कागदपत्रांची तपासणी करुन प्रमाणपत्रे सादर करण्यासाठी पुरेसा कालावधी उपलब्ध होईल.

Digitally signed by
Mrunali Ramsuram Katenge
Date: 13-02-2026 15:25:02
(मृणाली काटेंगे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

सोबत :- वरिल प्रमाणे.

पात्र संस्था यादी

| अ.क्र. | संस्थेचे नाव | संस्थेचा पत्ता | संस्थेचा फोन नंबर | संस्थेचा e-mail Id |
|---|---|---|---|---|
| १ | कलांगण | ४ कौस्तुभ, अनंत पाटील मार्ग, दादर (पू.) मुंबई २८ | ९५९४९६२५८८ | kalavarshab@gmail.com |
| २ | अभिनया इन्स्टिट्यूट ऑफ रिसर्च अँड फाईन आर्टस. | रो हाउस नं १, इच कॉलोनी, पंचवटी, अंबाडी रोड, वसई पश्चिम, मुंबई. | ९३२२९१८२९० | dancerforlife९१@gmail.com |
| ३ | सौ. सुशीला पृथ्वीराज चव्हाण प्रतिष्ठान | २/ २४ वार्डन बिल्डींग, गणपत कदम मार्ग, लोअर परेल, मुंबई ४०००१३ | ९९२०८६९२९२ | sspcpeducationalculturalcentre@gmail.com |
| ४ | स्वप्निल सपना लोककला विकास मंडळ | थोरले माने गाव तालुका माढा जिल्हा सोलापूर | ९८५०४६४४०८ | vamanbavale२१@gmail.com |
| ५ | प्रबोधिनी शाहिरी कला पथक संस्था, इचलकरंजी | २४/६६०, शहापूर रोड, सुर्वे मळा, कृष्णानगर, इचलकरंजी, ता.हातकणंगले जि. कोल्हापूर | ८१४९७०१८५३ | parshantpowar५७४@gmail.com |
| ६ | नृत्यांलिका | E-३/४ अपना घर सोसायटी, पंप हाऊस अंधेरी (पू.) | ९८२०१२६१२१ | nritualikainstitution@gmail.co m |
| ७ | नटना नृत्य अकॅडमी | आय विंग-२०१, शांती कॉम्प्लेक्स, साकी विहार रोड, तुंगा, पवई. | ९८१९९५९४८४ | geetsalian@yahoo.com |
| ८ | नृत्यकला निकेतन | ४/१४ डिंडेसी बिल्डिंग, गायवाडी गिरगाव, चर्नी रोड, मुबई. | ९८२०७७६८९८/ ८५९१८९४१०१ | niketannrityakala@gmail.com |
| ९ | व्हायोलीन अकॅडमी | तुळसीबागवाले कॉलनी, पुणे | ८९७५००३२१३ | violinpune@gmail.com |
| १० | श्री. जयदीप सेवाभावी शिक्षण संस्था उदगीर द्वारा संचलित सरस्वती संगीत विद्यालय | विकास नगर देगलूर रोड उदगीर, जिल्हा- लातूर, पिन कोड ४१३ ५१७ | ८२०८१४२१७३ | nrjawale@gmail.com |
| ११ | संगीत साधन कला सांस्कृतिक व सेवाभावी प्रतिष्ठान | मारवाडी गल्ली, हिंगोली. | ९८८१००९७९९ | shaileshn२३७२@gmail.com |
| १२ | सांस्कृतिक निकेतन | स्वामी विवेकानंद हायस्कूल, सिंधी सोसायटी, चेंम्बूर, मुंबई. | ९८२०४१८३११ | vivekini@ves.ac.in |
| १३ | नवजीवन ग्रामोद्य प्रतिष्ठान | प्लॉट नं-६१, अष्टविनायक कॉलनी, तुळजाभवानी मंदिरासमोर, पाइपलाइन रोड, सावेडी, अहिल्यानगर-४१४००३ | ९८५०२१६१५० | ngp१९९४@gmail.com |